भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
सत्यमेव जयते
Rs. 500
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA १२३३० 2023 ५००४) CB 534389

17 NOV 2023 अ. ०२

विठ्ठल उत्तमराव भोयर

सुरेंद्र वि. देशमुख
मुद्रांक विक्रेता, कॅम्प, अमरावती

OFFICE OF THE TREASURY OFFICER
- 2 NOV 2023

## द्विपक्षीय करारनामा

लिहुन देणार :- भोयर टुर्स ॲन्ड ट्रव्हल्स अमरावती.

लिहुन घेणार :- नोडल अधिकारी,जिल्हा अंमलबजावणी कक्ष,
स्मार्ट प्रकल्प,बुलढाणा करार नामा दिनांक २९/११/२०२३ ते २८/११/२०२४ पर्यंत आहे.

वाहन भाडेतत्वावर पुरवठ्याबाबत निविदेच्या अटी व शर्ती

१. पोहोच करण्याचा कालावधी आणि ठिकाण:-
कार्यालयाच्या मागणीप्रमाणे सांगितलेल्या दिवशी किंवा वेळेवर वाहनाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
पत्ता :- मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) जिल्हा अंमलबजावणी कक्ष,बुलढाणा कार्यालयापासुन ते सांगितलेल्या ठिकाणी पर्यत व परत मुख्यालयी.

२. पुरवठा आदेश :-
दौर करणे करिता आवश्यक पुरवठा आदेश प्रत्येक वेळी स्वतंत्र रितीने नोडल अधिकारी यांच्या स्वाक्षरीने आपणास देण्यात येईल.

३. देयक अदा करण्याबाबत अटी :-

कार्यालय
जि.प्र.अं.कक्ष स्मार्ट
बुलढाणा
आवक क्रमांक- ९३४
दि. २८/११/२३

देयक सादर केल्यानंतर निधीच्या उपलब्धते नुसार देयक अदा करण्यात येईल त्यास विलंब झाल्यास कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी करता येणार नाही.देयक अदा करतांना देयकावर लागु असलेले कर कपात करुन देयक अदा केले जाईल.

इतर सर्व अटी व शर्ती

४. वाहने सुस्थीत चालु ठेवण्यासाठी लागणारे सर्व खर्च जसे की इंधन,तेल,उपभोग्य वस्तु आवश्यक देखभाल चालकाचा पगार इतर होणारा खर्च वाहन पुरवठादारास करावा लागेल.

५. सर्व लागणारे कर,परवाने,सर्वसमावेशक विमा भरले असावीत आणि वाहन व्यावसायिकरित्या चालवण्याकरीता इतर कोणतीही कागदपत्रे पूर्ण असावीत आणि ती वाहनांमध्ये उपलब्ध असावीत.

६. कोणत्याही कामाच्या किंवा रविवार किंवा इतर सुट्टीच्या दिवशी वाहनाची आवश्यकता असू शकते.

७. प्रदान केलेल्या ड्रायव्हरकडे किमान तीन वर्षाचा अनुभव असलेला वैध ड्राव्हीग लायसन्स असणे आवश्यक आहे.एजन्सीने वापरादरम्यान वैध परवान्यांच्या छायाप्रत सादर करणे आवश्यक आहे वाहन चालकांनी वाहतुक नियम आणि वेळोवेळी शासनाने विहीत केलेल्या इतर नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

८. वाहन किंवा इतर कोणत्याही वाहनांचे नुकसान,इजा नुकसान किंवा अपघात यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

९. वाहनांची तपासणी करुन त्याचे प्रमाणपत्र लावणे बंधनकारक राहील हे कार्यालय अशा खर्चाची परतफेड करणार नाही.

१०. एजन्सीकडे त्यांचे वाहन कमी वेळेत दुरुस्त करण्याची व्यवस्था असावी आणि दुरुस्तीच्या काळात एजन्सीने पर्यायी वाहन आणि चालक त्वरीत उपालब्ध करुन घ्यावे.

११. एजन्सीकडे टेलिफोन सुविधा (२४ तास) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१२. एजन्सी प्रवास दरम्यान पार्किग शुल्क/टोल शुल्क भरेल आणि मासिक बिला सोबत एजन्सीला त्याची प्रतीपुर्ती केली जाईल.

१३. कोणत्याही दिवशी कोणत्याही वाहनाने वरील अटी व शर्ती पुर्ण न केल्यास दंड रुपये १०००/- प्रतिदिन आकारले जाऊ शकतात.

१४. नमुद केलेले दर कराराच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध असावेत.इधन शुल्क, कर इत्यादीच्या वाढीमुळे नमुद दरंमध्ये कोणतीही सुधारना केली जाणार नाही.

१५. करार सुरुवातीला एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल जर समाधानकारक सेवा प्रदान केल्यास सहा महिन्यापर्यंत विद्यमान मान्य मापदंड बदलल्याशिवाय वाढवता येईल.

१६. एजन्सीने लॉग बुक रजिस्टर ठेवावे आणि दौऱ्यावर संबंधीत अंधधिकाऱ्याची स्वाक्षरी (ज्या मध्ये दौरा कोणी केला,दौऱ्याचे प्रयोजन,प्रवासाच्या सुरवातीचे व शेवटचे एकूण किलोमीटर,इ.) या कार्यालयास बिलासह लॉग बुक रजिस्टर सादर करावे

१७. एजन्सीला कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणर नाही.चालकांची राहण्याची व्यवस्था,बोर्डिंग आणि भत्ता वगैरे' ०१ ते १८ अटी व शर्ती मला मान्य आहे. करिता करारनामा लिहून देत आहे.

नोडल अधिकारी (स्मार्ट)
जि.प.बुलढाणा

Bhoyar Tours & Travels
Proprietor